दिनांक – २२/१२/२०१७

- प्रेसनोट –

पुण्यातील कर्वेनगर भागात टोळक्यासह दरोडा टाकणारे आरोपी भारती विदयापीठ पोलीसांकडुन जेरबंद

दिनाक.२२/१२/२०१७ रोजी वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री कमलाकर ताकवले सो व पोलीस निरीक्षक(गुन्हे) राजकुमार वाघचवरे सो यांच्या आदेशाने भारती विदयापीठ पो.स्टे पुणे शहर यांच्यासह भारती विदयापीठ पोलीस ठाणे हददीत गुन्हेप्रतिबंध पेट्रोलिंग करत असताना कात्रज बायपास दत्तनगर ब्रिज याठिकाणी आलो असता पो शि शिवदत्त गायकवाड, व पो ना प्रणव संकपाळ यांना त्याच्या बातमीदारामार्फत बातमी मिळाली की, दोन इसम त्यापैकी एकाने आकाशी रंगाचा टिशर्ट व एकाने हिरव्या कलरचा फुल भायाचा शर्ट घातलेला आहे व दोघांनीही जिन्सच्या पॅन्ट घातलेल्या आहेत त्यांच्याकडे चोरीचे सोन्याचे दागिने आहेत व ते आता कात्रज बायपास चौकात मुंबईकडे जाणारे रोडवर थांबलेले आहेत अशी खात्रीशीर बातमी मिळाल्याने मिळालेली बातमी मा वरिष्ठ पोलीस निरीक्षक सो यांना कळविली असता त्यांनी योग्य ति कारवाई करण्याचा मौखिक आदेश दिल्याने लागलीच बातमीच्या ठिकाणाचे थोडे अलिकडे थांबुन आमच्या दोन टिम तयार करुन सापळा रचुन बातमी प्रमाणे खात्री करुन कात्रज बायपास चौकात थांबलेल्या वरील वर्णनाच्या इसमांना शितापीने छापा घालुन जागेवरच १२/३५ वा पकडुन त्यांना आहे त्या स्थितीत ठेवुन त्यांचे नाव पत्ता विचारता त्यानी आपली नावे १. रनजित आंनदराव कांबळे, वय २५ वर्षे, रा. मु पो भाळवणी, ता पंढपरपुर जि सोलापुर २) सचिन हनमंत कुरळे वय २६, रा. मु पो उघडेवाडी ता माळशिरस जि सोलापुर असे सांगितले पंचासमक्ष अ नं १ रणजित कांबळे याची झडती घेता त्याचे पॅन्टचे खिशात एका प्लॅस्टिकची पिशवी मिळुन आली त्यामध्ये पिवळ्या धातुचे दागिने मिळुन आले त्यामध्ये चार चैनी, तीन ब्रेसलेट, दोन अंगठ्या, व विओ कंपनीचा मोबाईल, इत्यादी एकुण ५३.०५ तोळे सोने १३,३७,५००/- रु कि माल मिळुन आला त्याचे बाबत त्यांचेकडे तपास केला असता त्यानी असमाधान कारक व उडवाउडवीची उत्तरे देवु लागल्याने त्यास सी आर पी सी ४१ (१)(ड) प्रमाणे अटक करण्यात आली. अटक मुदतीत त्याच्याकडे सखोल चौकशी केली असता त्यांनी सांगितले की, ते मुकेश शेलार कर्वेनगर पुणे यांची ॲपल ज्युसची गाडी असुन त्याच्यावर ज्युस पिण्यासाठी जात असताना त्याच्या गळयामध्ये, हातामध्ये सोन्याचे दागिणे पाहिले होते. ते दागिणे लुटण्याचे ठरवुन दि.१७/१२/२०१७ रोजी वरिल आरोपी याचा साथीदार तेजस जाधव यांने फोन करुन मुकेश शेलार यास त्याच्या मुलाच्या केस संदर्भातील वकीलांनी दिलेली कागदपत्र दयावयाचे असे सांगुण त्यास पोतणीस परिसर येथे बोलावुन वरिल आरोपी व त्याचे साथीदार तेजस जाधव, रामभाऊ डावरे व त्याचा मित्र यांनी मिळुन त्यास त्याच्याकडील पाढऱ्या रंगाच्या स्विप्ट कार मध्ये जबरदस्तीने बसुन पुणे बेगलोर हायेवर घेवुन जावुन त्याच्याकडील सोन्याचे दागिणे चाकुचा धाक दाखवुन, हाताने मारहाण करुन, व त्याच्या मुलीला ठार मारण्याची धमकी देवुन लुबाडले होते व मुकेश शेलार यास खेडशिवापुर येथे सोडुन गेले होते. अशी माहिती दिली. सदर बाबत अंलकार पोलीस ठाणे येथे गुरन.२१८/२०१७ भादवि कलम. ३९५,३६४(अ) प्रमाणे गुन्हा दाखल आहे.

सदर आरोपी यांनी अश्याप्रकारे आणखीने काही गुन्हे केले आहेत का ? फरारी आरोपीचा तपास चालु आहे.

सदर कामगिरी दक्षिण प्रादेशिक विभाग चे अप्पर पोलीस आयुक्त श्री रविंद्र सेनगावकर, परिमंडळ २ पुणे चे पोलीस उपायुक्त श्री डॉ. प्रविण मुंढे सो, सहाय्यक पोलीस आयुक्त डॉ. शिवाजी पवार सो यांचे मार्गदर्शनाखाली भारती विदयापीठ पोलीस स्टेशन पुणे चे वरिष्ठ पोलीस निरीक्षक कमलाकर ताकवले सो, पोलीस निरीक्षक(गुन्हे) राजकुमार वाघचवरे तसेच तपास पथकाचे पोलीस उपनिरिक्षक डी आर मोहिते सो कर्मचारी कृष्णा निढाळकर, चंद्रकात फडतरे, प्रणव संकपाळ, उज्वल मोकाशी, अमोल पवार , गणेश चिंचकर, शिवदत्त गायकवाड, महेश मंडलीक, कुंदन शिंदे, अभिजीत रत्नपारखी, यांनी केलेली आहे




भारती विद्यापीठ पोलिस स्टेशन, पुणे शहर